**परकीय भाषा विभागात आपला प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी –**

१) गुणवत्ता यादी शेवटच्या पानापर्यंत पहा. तुमचे नाव पहिल्या गुणवत्ता यादीत असेल तर तुमच्या नावापुढे तुकडी दिलेली असेल.

२) नाव प्रतीक्षा यादीत असेल तर नावापुढे तुकडी लिहिलेली नसेल व आत्ता तुम्हाला पुढची प्रक्रिया करता येणार नाही.

३) गुणवत्ता यादीत नाव असलेल्यांनी आपल्याला मिळालेली तुकडी जर सोयीची असेल तर http://campus.unipune.ac.in येथे तुमच्या खात्यावर जा व तुमच्या अभ्यासक्रमाच्या शुल्काचे **बँक ऑफ महाराष्ट्र किंवा एच्.डी.एफ्.सी. बँकेचे चलन निर्माण करा.** व त्याची छापील प्रत घेऊन त्या बँकेच्या कोणत्याही शाखेत शुल्क भरावे. त्या चलनाचे दोन भाग तुम्हाला शिक्का मारून परत मिळतील.

४) त्यातील एक भाग परकीय भाषा विभाग, पुणे विद्यापीठ, गोपाळ कृष्ण गोखले रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ येथे **विहित वेळेत** आणून द्यावा व दुस-या भागावर मिळाल्याची पोच घ्यावी.

५) **विहित वेळेत सदर चलनाचा भाग आणून न दिल्यास तुमचा प्राधान्यक्रम नाहीसा होईल.** मग पुढील गुणवत्ता याद्यांतील उमेदवारांचा त्यावर हक्क निर्माण होईल व सर्वात शेवटी तिस-या यादीनंतरही जर जागा उरल्या तरच पुन्हा तुमचा विचार होईल.

६) तुम्ही जो फोटो स्कॅन करुन जोडला होतात, तोच तुमचे ओळखपत्र बनवण्यासाठी घेऊन यावा.

**कृपया लक्षात घ्या –**

- नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणा-यांनो, तुम्ही एकापेक्षा अधिक भाषांच्या अभ्यासक्रमांसाठी किंवा एकाच भाषेच्या प्रमाणपत्र आणि जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी अर्ज करून ठेवू इच्छित असल्यास प्रत्येक अभ्यासक्रमासाठी नव्याने चलन निर्माण करून प्रत्येकी ३०० रुपये भरावे लागतील. तुमचे नाव एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता यादीत आले तरी **प्रवेश कोणत्यातरी एकाच अभ्यासक्रमाला घेता येईल.** इतर अभ्यासक्रमांच्या अर्जाचे ३०० रुपये परत मिळणार नाहीत.
- नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणा-यांनो, तुम्ही कोणतीतरी एकच भाषा निवडून त्यासाठी अर्ज केलात पण त्या भाषेसाठी खूपच जास्त अर्ज आले व तुमचे नाव यादीत लागू शकले नाही तर तुम्हाला त्याच प्रवेश फीमध्ये दुस-या भाषेच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल. असे प्रवेश तिस-या गुणवत्ता यादीची प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर होतील व त्याबाबत तुमच्याशी इ-मेलने संपर्क साधला जाईल. तरी दि. २२ जुलै रोजी आपला इ-मेल पहा.